




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १५७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१९ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पाया रचला, पण विस्तार का रखडला ?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्ताराचा मुहूर्त कधी, असा प्रश्न निर्माण झाला आहे. विस्तारीकरणाच्या भूमिपूजनाला वर्षभराचा कालावधी लोटला असून अद्याप याला केंद्राकडून मंजुरी मिळालेली नाही. या विलंबामुळे विस्तारीकरणाचे कंत्राट मिळालेली जीएमआर कंपनी त्रस्त असून सध्या 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत आहे.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने येथील विमानतळाच्या अद्ययावतीकरण प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. या सोहळ्याला आता वर्षभराहून अधिकचा कालावधी लोटला असून विमानतळ जीएमआर कंपनीकडे हस्तांतरित झालेले नाही. नागपूर विमानतळाचा विस्तार तसेच अद्ययावतीकरण हे सुरुवातीपासून वादात राहिलेले आहे. विमानतळाच्या जागतिक दर्जाच्या विकासासाठी एमआयएलने आंतरराष्ट्रीय पातळीवरील निविदा आमंत्रित केल्या होत्या. यात १३ कंपन्या सहभागी झाल्या होत्या. यानंतर तांत्रिक मुद्द्यावर चार कंपन्यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रवाशांच्या सोयीनुसार संपूर्ण विमानतळ नव्याने बांधणे, टर्मिनल्स, विमानांची पार्किंग व्यवस्था आदी मुद्द्यांवरून राज्य सरकारला महसुलातील वाटा देण्याच्या प्रमाणावर बराच काळ वाटाघाटी चालल्या. जीएमआरने ५.७६ टक्क्यांवरून १४.४९ टक्के महसुलाचा वाटा देण्याचे मान्य केले. याआधारे जीएमआर कंपनीची निवड करण्यात आली.

१२ मार्च २०१९ रोजी लेटर ऑफ अवॉर्ड देण्यात आले. कन्सेशन ॲग्रीमेंटचा मसुदा तयार करण्यात आला. सरकारच्या सूचनेवरून एमआयएलने १९ मार्च २०२० रोजी कंत्राट रद्द करण्याचा निर्णय जाहीर करून निविदा प्रक्रिया रद्द केली. त्यानंतर जीएमआरने न्यायालयीन लढाईमध्ये विजय प्राप्त केला आणि अखेर पंतप्रधान मोदींच्या हस्ते अद्ययावतीकरणाचे भूमिपूजन झाले. त्यावेळी तीन महिन्यांच्या आत हस्तांतरण होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, अजून याबाबत निर्णय झालेला नाही. याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे रखडलेला आहे. केंद्राच्या मंत्रिमंडळाने या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर जीएमआर कामाला लागणार आहे. सध्या कंपनी प्रतीक्षावस्थेत आहे. नागपूर विमानतळाच्या विस्तारीकरणाबाबत पंधरा दिवसांत जीआर काढू, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीदरम्यान दिले होते. त्याचादेखील विसर सरकारला पडला आहे.

**नाव मोठे, दर्शन छोटे !**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ हे केवळ नावालाच आंतरराष्ट्रीय ठरत आहे. येथून सद्यस्थितीत केवळ शारजाह आणि दोहा या दोनच आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू आहेत. करोनापूर्वकाळात येथून देशांतर्गत दररोज ४० विमाने यायची. हा आकडादेखील गाठण्यात विमानतळ प्रशासनाला अपयश आले आहे. मुख्य म्हणजे विमानतळ परिसरातील मोकाट श्वानांचा हैदोस नेहमीच प्रवाशांसाठी त्रासदायक राहिला आहे.

# एसटीच्या प्रवासामध्ये दिव्यागांना मिळणार हक्काचे सीट!

## विभाग नियंत्रक धाराशिव यांचे कडक आदेश...

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.१८, धाराशिव :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये दिव्यांग प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सुविधा प्रत्यक्षात केवळ कागदावरच असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. दिव्यांगांसाठी राखीव असलेली आसने बळकावली जात असून, प्रवासादरम्यान त्यांना अपमानास्पद, उद्धट आणि हिन दर्जाची वागणूक दिली जात असल्याच्या गंभीर तक्रारी सातत्याने वाढत आहेत. इतकेच नव्हे, तर शासनमान्य ॡखृ ओळखपत्र थेट नाकारण्याचे प्रकार घडत असल्याने एसटी महामंडळाची प्रतिमा मातीमोल होत आहे.

या पार्श्वभूमीवर अखेर एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाला जाग आली असून, दिव्यांग प्रवाशांचे हक्क डावलणाऱ्या प्रवाश्यावर लगाम घालण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. सर्व विभाग नियंत्रक व आगार व्यवस्थापकांना दिव्यांग प्रवाशांना सर्वोच्च प्राधान्य देण्याचे सक्त निर्देश देण्यात आले आहेत.

दिव्यांगांच्या कायदेशीर हक्कांवर गदा खपवून घेतली जाणार नाही अशी एसटी महामंडळाने ठाम भूमिका घेत स्पष्ट केले आहे. दिव्यांग प्रवाशांसाठी राखीव असलेली आसने कोणत्याही परिस्थितीत इतर प्रवाशांसाठी वापरता येणार नाहीत.तसेच बस मार्गावर कुठल्याही थांब्यावर दिव्यांग प्रवासी चढल्यास, सदर आसन रिकामे करून देण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित वाहकाची राहील. तर UDID कार्ड (मूळ किंवा झेरॉक्स प्रत) नाकारण्याचा वाहकाला कोणताही अधिकार नाही. तसेच दिव्यांग प्रवाशांशी उद्धट, अपमानास्पद किंवा हिन दर्जाची वागणूक झाल्यास ती गंभीर शिस्तभंगाची बाब मानली जाईल. तसेच तक्रार आली तर थेट कारवाई करण्यात येईल असे महाव्यवस्थापक (वाहतूक) यांनी दिलेल्या आदेशानुसार म्हटले आहे.

- दिव्यांग प्रवाशांबाबत तक्रारी आल्यास संबंधित वाहक, पर्यवेक्षक, तपासणीस अधिकारी तसेच आगार व्यवस्थापकांवर थेट कठोर कारवाई करण्यात येणार आहे.
- सूचनांचे पालन न केल्यास विभाग नियंत्रकांवरही जबाबदारी निश्चित केली जाणार आहे.
- कर्मचाऱ्यांच्या विशेष बैठका घेऊन स्पष्ट सूचना देणे
- दप्तरी नोंदी ठेवून वाहकांच्या स्वाक्षऱ्या घेणे
- आरक्षण खिडकीवरील कर्मचाऱ्यांमध्ये सक्तीने जागरूकता निर्माण करणे हे सर्व आदेश तात्काळ अंमलात आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**दिव्यांग प्रवासी ओझे नाहीत – पण अपमान सहन करणार नाहीत!**

- एसटी महामंडळाच्या या कडक आदेशांमुळे दिव्यांग प्रवाशांवर होत असलेला अन्याय थांबेल की, हे आदेशही पूर्वीप्रमाणे फक्त फाईलपुरतेच मर्यादित राहतील, हा प्रश्न अद्याप कायम आहे. मात्र, यापुढे तक्रारी आल्यास कारवाई अटळ असून कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट आणि कठोर इशारा प्रशासनाने दिला आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात जखमी युवकाचा मृत्यू !

## कळमना परिसरात भीतीचे वातावरण...

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** बल्लारपूर तालुक्यातील कळमना वनक्षेत्रालगत असलेल्या बेघरवस्ती परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या नितेश सुभाष शेंडे (वय ३२) या युवकाचा रविवारी मृत्यू झाला. उपचारासाठी चंद्रपूर येथून नागपूरला नेत असताना जामजवळ दुपारी सुमारे १.३० वाजताच्या सुमारास त्याने अखेरचा श्वास घेतला. या घटनेमुळे कळमना परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. १६ जानेवारी रोजी रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास बल्लारपूर तालुक्यातील कळमना येथील बेघरवस्ती परिसरात नितेश शेंडे घराबाहेर शौचास गेले असता, दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. जीव वाचवण्यासाठी नितेश यांनी बिबट्याशी झुंज दिली व त्याला पळवून लावले. मात्र या झटापटीत त्यांच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली. या घटनेची माहिती शनिवारी वनविभागाला देण्यात आली. त्यानंतर वनकर्मचाऱ्यांनी जखमी नितेश शेंडे यांना प्रथम बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयात, त्यानंतर चंद्रपूर येथील सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना घरी पाठवण्यात आले. मात्र जखम गंभीर असल्याने त्यांची प्रकृती अधिकच खालावली. रविवारी पुन्हा त्यांना उपचारासाठी चंद्रपूरच्या सामान्य



रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तिथे आवश्यक आणि योग्य उपचार मिळाले नाहीत, असा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. पुढील उपचारासाठी त्यांना नागपूर येथील रुग्णालयात हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु नागपूरकडे नेत असतानाच रस्त्यात त्यांचा मृत्यू झाला.

**वेळेवर उपचार न झाल्यामुळे मृत्यू**

▶ नितेश शेंडे यांच्या मृत्यूस ग्रामीण रुग्णालयातील हलगर्जीपणा जबाबदार असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या रुग्णालयांमध्ये जर वेळेवर व योग्य उपचार मिळत नसतील, तर अशा सुविधा कशासाठी, असा संतप्त सवाल नातेवाईकांनी उपस्थित केला आहे. रुग्णांना केवळ एका रुग्णालयातून दुसऱ्या रुग्णालयात पाठवण्याचा कारभार सुरू असून, याच निष्काळजीपणामुळे नितेश यांचा मृत्यू झाल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. दरम्यान, कळमना वनक्षेत्रात मानव–वन्यजीव संघर्ष दिवसेंदिवस वाढत असून, नागरिकांमध्ये तीव्र दहशत पसरली आहे. वनविभागाने तातडीने उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

**वन विभागाकडून तातडीने ५० हजाराची मदत**

▶ नितेश रात्रीच्या सुमारास बाहेर शौचालयास गेला. नेमक्या त्याचवेळी दबा धरुन असलेल्या बिबट्याने त्याचेवर हल्ला केला. लगेच त्याला कळमना येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविण्यात आले. मात्र त्याची प्रकृती गंभीर असल्यामुळे बल्लारपूर येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथून चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात नेले. मात्र प्रकृती अधिक गंभीर असल्यामुळे त्याला नागपूर येथे नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. याबाबत गावकऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला. मात्र, वन विभागाने त्याच्या कुटुंबयांची समजूत घालून तातडीने ५० हजाराची मदत केल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र घोरूडे यांनी दिली.

# जमिनीच्या वादातून तुफान राडा; कुटुंबातीलच दोघांना जीवे मारण्याचा प्रयत्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, सिन्नर :** शहरातील सिल्व्हर लोटस स्कूलबाहेर शाळेचे अध्यक्ष दिलीप पुंजाराम बिन्नर यांच्यावर त्यांच्या वडिलांसह सख्ख्या भावांकडून थेट अंगावर कार घालून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. या गंभीर हल्ल्यात दिलीप बिन्नर, त्यांची पत्नी सोनल बिन्नर, शाळेचे प्रशासक सागर लोणारे व मुख्याध्यापिका मनीषा गुरुळे जखमी झाले आहेत. गुरुवारी (दि. १५) हा प्रकार घडला. घटना सीसीटीव्हीत चित्रीत झाली आहे. सिन्नर पोलिसांत दोन्ही गटांकडून परस्परविरोधी तक्रारी देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, याप्रकरणी दिलीप बिन्नर यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी त्यांचे बंधू योगेश बिन्नर यांना सिन्नर पोलिसांनी गजाआड केले आहे. १७ जानेवारी रोजी होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या तयारीदरम्यान शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर साफसफाई सुरू असताना दुपारी १.३० वाजेच्या सुमारास दिलीप बिन्नर यांचे सख्खे भाऊ योगेश, मंगेश बिन्नर आणि वडील पुंजाराम बिन्नर हे कारने (क्र. एमएच १५, जेएच ७०५९) घटनास्थळी आले.

कारचालक योगेश बिन्नर याने थेट दिलीप बिन्नर यांच्या पत्नी सोनल बिन्नर यांच्या अंगावर कार घातली. त्या थोडक्यात बचावल्या; मात्र खुर्चीवर बसलेले दिलीप विन्नर कारच्या धडकेत गंभीर जखमी झाले. यानंतर लोखंडी रॉड आणि दगडाच्या साहाय्याने पुन्हा हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला. हल्लेखोरांनी सोनल बिन्नर यांनाही जमिनीवर पाडून मारहाण केली. मध्यस्थी करणाऱ्या प्रशासक सागर लोणारे यांनाही मारहाण करण्यात आली.

**जमिनीच्या वादातून घटना !**

दरम्यान, शाळेच्या गेटवर घडलेला संपूर्ण थरार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला असून त्याच्या आधारे घटनाक्रम स्पष्ट करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून केला जात आहे. जमिनीच्या वादातून सुरू झालेला हा संघर्ष थेट शाळेच्या आवारापर्यंत पोहोचल्याने सिन्नर शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात दिलीप बिन्नर यांच्यावर हल्ल्याचा गुन्हा दाखल झाल्यानंतर आता योगेश



पुंजाराम बिन्नर यांनी दिलीप बिन्नर आणि त्यांच्या शाळेतील इतर सात जणांविरोधात सिन्नर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. योगेश बिन्नर यांनी दिलेल्या तक्रारीत जमिनीच्या वादातून आपल्यावर वडिलांसह भावांवर शिवीगाळ, दमदाटी आणि मारहाण झाल्याचा आरोप केला. या तक्रारीनुसार पोलिसांनी संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवला असून, दोन्ही बाजूंच्या तक्रारींचा समांतर तपास सुरू आहे.

# प्रायव्हेट फोटो अन् २० लाखांची मागणी !

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.१८, अहिल्यानगर :** सोशल मीडियाच्या आडलपून प्रायव्हेट फोटो व्हायरल करण्याची धमकी, जीवावर उठणारे मेसेज आणि तब्बल २० लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या श्रीगोंदा पोलिसांनी खंडणीखोर टोळीचा कणा मोडून काढला आहे. तीन सराईत आरोपींना गजाआड करत पोलिसांनी ५४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहेत.

१ जानेवारीपासून फिर्यादी वैभव आसाराम खेंडके (वय २७, रा. श्रीगोंदा) यांना अज्ञात मोबाईल क्रमांकावरून व्हॉट्सॲपवर धमकीचे मेसेज येऊ लागले. तुझे खासगी फोटो व्हायरल करू अशी भीती दाखवत आरोपींनी २० लाखांची खंडणी मागितली. घाबरलेल्या वैभव यांनी सुरुवातीला १ लाख ५० हजार रुपये दिले. मात्र एवढ्यावर न थांबता आरोपींनी आता तुला किंवा तुझ्या घरच्यांना जिवंत सोडणार नाही अशी जिव्हारी लागणारी धमकी दिली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून श्रीगोंदा पोलिसांनी वेळ न दवडता मोहीम उघडली. पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथके तयार करण्यात आली. सायबर सेलच्या मदतीने मोबाईल ट्रेसिंग करत खंडणीखोरांच्या मुसक्या आवळण्यात आल्या. चौकशीत आकाश पोपट मोरे, बापू विठ्ठल शिंदे आणि किरण विठ्ठल शिंदे हे तिघे मुख्य आरोपी निष्पन्न झाले.

# प्रजासत्ताक दिनावरील आतंकवादाचे सावट ही गंभीर बाब !



प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीसह काही शहरांवर आतंकवादी आक्रमणांचा धोका वाढल्याची चेतावणी गुप्तचर विभागाने दिली आहे. खलिस्तानी आतंकवादी संघटना आणि बांगलादेशातील आतंकवादी गट भारताच्या प्रजासत्ताक दिनी देशातील प्रमुख शहरांना लक्ष्य करण्याच्या सिद्धतेत असल्याचे गुप्तचर विभागाने सांगितले आहे. गेल्या काही वर्षांत देशात साजरे होणारे राष्ट्रीय सण आणि हिंदूंचे धार्मिक उत्सव आतंकवाद्यांच्या नेहमीच रडारवर असतात. आतंकवादाच्या सावटाखाली सण-उत्सव साजरा करणारा भारत हा जगातील एकमेव देश असावा. स्वातंत्र्यानंतर देशाची दीर्घकाळ सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसने भारतात दहशतवादाला खतपाणी घातल्याचा आरोप विद्यमान सरकार सातत्याने करत आले आहे मात्र मागील ११ वर्षांहून अधिक काळ देशाची सत्ता उपभोगणाऱ्या वर्तमानातील सरकारलाही देशावरील दहशतवादी हल्ले थोपवता आले नाहीत हे सत्य नाकारून चालणार नाही. इस्लामी दहशतवादाने आज सारे जग त्रस्त आहे; मात्र इस्त्रायल, चीन, अमेरिका सारख्या राष्ट्रांनी दहशतवादाला जशास तसे उत्तर देऊन दहशतवादाचा चांगलाच बिमोड केला. आतंकवादाला पोसणाऱ्या देशातील शक्तींवर या देशांनी कठोर निर्बंध घातले आहेत. चोहोबाजूंनी शत्रूराष्ट्रांनी घेरलेले असतानाही इस्रायलसारखा इवलासा देश आतंकवादाला पुरून उरला आहे. आपल्या देशात आतंकवादी हल्ला करणाऱ्या आतंकवाद्यांचे अड्डे ज्या ठिकाणी आहेत त्या ठिकाणी अमेरिका आपले सैन्य घुसवून त्यांचा नायनाट करते, मग ते अड्डे अन्य कोणत्याही देशात का असेनात. याउलट भारताच्या सीमेवरून आतंकवादी देशात घुसतात, इथल्या जिहादी धर्मांधांना शस्त्र पुरवून त्याचे रीतसर प्रशिक्षण देतात, इथले काही देशद्रोही नागरिक त्यांना आश्रय देतात, त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करतात, त्यांना त्यांच्या कारवायांत मदत करतात, इथलेच देशद्रोही जिहादी भारतात आतंक माजवण्यासाठी स्लीपर सेल म्हणून काम करतात. पहलगाम मध्ये झालेला रक्तपात, दिल्लीत लाल किल्ल्याजवळ झालेला शक्तिशाली स्फोट ही हल्लीचीच दोन उदाहरणे. अशा घटना घडल्या की काही दिवस शोक व्यक्त केला जातो, निषेध मोर्चे काढले जातात, वृत्तवाहिन्यांवर चर्चासत्रे घडतात. सरकारकडून कठोर प्रत्युत्तर देण्याचे आश्वासन दिले जाते, कालांतराने या सर्व घटना नागरिकांच्या विस्मरणात जातात. ज्या बांगलादेशाला भारताने स्वातंत्र्य मिळवून दिले त्याच बांगलादेशात आज हिंदूंना वेचून ठार केले जात आहे, जिवंत जाळले जात आहे, हिंदू स्त्रियांवर मग ती बालिका असो, विवाहित असो वा विधवा जिहादी वासनांधांकडून त्यांना लक्ष्य केले जात आहे. हिंदूंची घरे, दुकाने फोडली आणि जाळली जात आहेत. हिंदूंची शक्तिस्थाने असलेल्या मंदिरांवर आक्रमणे करून ती भ्रष्ट केली जात आहेत, त्यांची तोडफोड केली जात आहे, मंदिरांतील मूर्त्यांची विटंबना केली जात आहे. हे मागील एक वर्षाहून अधिक काळापासून अविरत सुरु असताना भारत सरकार मात्र त्यावर काहीच कारवाई करताना दिसत नाही. याच बांगलादेशातील नागरिकांनी आज संपूर्ण भारतभरात घुसखोरी केली असून अनेक शहरे बकाल केली आहेत, भारतात येऊन शासकीय कागदपत्रे बनवली आहेत, नोकऱ्या मिळवल्या आहेत, व्यवसाय थाटले आहेत, अवैध वस्त्या वसवल्या आहेत. अमली पदार्थांची तस्करी, दरोडे, चोऱ्या, खून, बलात्कार, अपहरण, दंगल घडवणे यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये आज बांगलादेशी मोठ्या प्रमाणात सापडू लागले आहेत. पूर्वी केवळ शहरी भागांत सापडणारे बांगलादेशी आज देशातील खेड्या पाड्यांमध्येही दिसू लागले आहेत. देशात झालेल्या घुसखोरीची विषारी फळे आज इंग्लंड, फ्रान्ससारखी बलाढ्य राष्ट्रे भोगत आहेत. ज्या देशाचे मीठ खातात त्या देशाशी यांचे काहीही देणेघेणे नसते त्यामुळे हेच घुसखोर आतंकवाद्यांना साहाय्य करतात. जाणकारांच्या मते आजमितीला देशभरात १० कोटीहून अधिक बांगलादेशी घुसखोर राहत आहेत. हा आकडा भयंकर असून आज या घुसखोरीवर ठोस उपाययोजना केली नाही तर भविष्यात भारताची स्थिती इंग्लंड आणि फ्रान्ससारखी होण्यास वेळ लागणार नाही. जगात पहिल्या क्रमांकाची लोकसंख्या म्हणून बिरुद मिरवणारा भारत यामध्ये कोट्यवधींचे योगदान देणाऱ्या घुसखोरांबाबत गांभीर्याने विचार केव्हा करणार आहे ? आज इवलासा बांगलादेश भारतात घुसखोर घुसवून येथील अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेला आव्हान देतो, आपल्या देशात हिंदूंना वेचून ठार करतो आता तर थेट भारतात आतंकवादी हल्ला करण्याची तयारी बांगलादेशातील आतंकवादी संघटनांनी केली आहे. भारताचे सरकार आणखी किती दिवस बांगलादेशकडे दुर्लक्ष करणार आहे ? आतंकवाद हा स्थानिकांच्या बळावर वाढतो आणि यशस्वी होतो त्यामुळे आतंकवादाचा बिमोड करायचा असेल तर त्याला पोसणाऱ्या देशांतर्गत पिलावळीचा बंदोबस्त करण्याचे आव्हानही भारताला पेलावे लागणार आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या बलाढ्य भारताचे स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिन दहशतवादाच्या सावटाखाली साजरे होणे हे देशातील सरकारचे अपयश असून त्यावर गांभीर्याने उपाय शोधण्याची नितांत गरज आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

## आणखी किती प्रतीक्षा ?



मराठवाड्याची राजधानी असलेले छत्रपती संभाजीनगर औद्योगिक, ऐतिहासिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळखले जाते. ऑटोमोबाइल, ऑटोमोटिव्ह, फार्मा, कृषीपूरक उद्योगांसह विविध क्षेत्रांतील उद्योगांचे मोठे जाळे येथे आहे. संभाजीनगर आणि लगतच्या जालन्यात मिळून सात हजारहून अधिक छोटे मोठे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय उद्योग, सात ते आठ लाखांचे मनुष्यबळ अशी मोठी इकोसिस्टीम उभी राहिली आहे. सरकारच्या तिजोरीत औद्योगिक वसाहतींमधून साधारणपणे ६० हजार कोटींचा कर जमा होतो. इतके असतानाही छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रदर्शन केंद्र उभारणीसाठी नेहमीच चालढकल का केली जाते ?

औद्योगिक संघटनांनी यासाठी पाठपुरावा केला की सरकारी बाबूंकडून आलेल्या सूचनांचे पालन करत प्रस्ताव तयार करून सादर होतो. पण त्याच्या मंजुरीत व परिणामी अंमलबजावणीत अडचणी येतात. सरकार कुणाचेही आले तरी आश्वासनांपलीकडे काही झाले नाही. विभागातील औद्योगिक वसाहतीचा विकास झाला. उत्पादन, ऑटोमोबाइल, अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स, लॉजिस्टिक्स व संरक्षण क्षेत्राशी संबंधित उद्योगांमुळे शहराचा औद्योगिक नकाशा अधिक बळकट झाला. तरीही एक्स्पो-कम-इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरची २००८ पासून प्रतीक्षा आहे. १५ वर्षांपासून ५० एकर जमीन संपादित करून राखीव ठेवली गेली, व्यवहार्यता अभ्यास झाले, आराखडे झाले, मात्र निर्णयप्रक्रियेतील विलंब, समन्वयाचा अभाव आणि प्राधान्यक्रमातील बदल यामुळे हा प्रकल्प भूमिपूजनाच्या प्रतीक्षेतच आहे.

मुळात हे केंद्र म्हणजे निव्वळ एक इमारत नसते, तर तो उद्योग, व्यापार, पर्यटन, ज्ञान व सर्व क्षेत्रांचा केंद्रबिंदू असतो. औद्योगिक प्रदर्शने, व्यापार मेळे, आंतरराष्ट्रीय परिषदा, स्टार्टअप्स संमेलने, बी२बी बैठका, कौशल्य विकास उपक्रम, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम आदींसाठी अशी केंद्रे वापरली जातात. जागतिक अनुभव सांगतो की, अशा केंद्रांमुळे शहराचे ब्रँडिंग होते. गुंतवणूकदारांचा विश्वास वाढतो आणि त्या शहराची जागतिक पातळीवर अधिक ठळक ओळख होते.

छत्रपती संभाजीनगर हे देशाच्या मध्यवर्ती भागात स्थित असल्याने येथे चारही दिशांनी येणे सुलभ आहे. शहराचा ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा मोठा आहे. हे शहर देशातील एक आदर्श माइस (मीटिंग्ज, इंसेंटिव्हस, कॉन्फरन्सेस अँड एक्झिबिशन्स) डेस्टिनेशन होऊ शकते. मोठ्या परिषदा, प्रदर्शने, व्यावसायिक कार्यक्रमांमुळे हॉटेल, हॉस्पिटॅलिटी, वाहतूक, रिटेल, इव्हेंट मॅनेजमेंट, मीडिया, डिझाइन, कॅटरिंग व सुरक्षा यासारख्या पूरक उद्योगांना चालना मिळेल. थोडक्यात हे शहर अर्थव्यवस्थेचे 'ग्रोथ इंजिन' ठरेल. भारतात गेल्या काही वर्षांत अनेक टिअर २ शहरांत आंतरराष्ट्रीय दर्जाची कन्व्हेन्शन व प्रदर्शन केंद्रे उभी राहिली. रायपूर, जयपूर, चंडीगड आणि अहमदाबाद ही काही ठळक उदाहरणे. या शहरांत केंद्र स्थापनेनंतर केवळ कार्यक्रमांची संख्या वाढली नाही, तर त्या त्या प्रदेशांच्या अर्थव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन झाले, स्थानिक जीडीपीत भर पडली, पर्यटन वाढले, रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. कन्व्हेन्शन सेंटर उभारल्यास स्थानिक उद्योगाला थेट फायदे मिळतील; प्रदर्शने, परिषदांमुळे देशांतर्गत व परदेशी गुंतवणूकदारांचा ओघ वाढेल आणि 'मेड इन मराठवाडा' किंवा 'मेड इन छत्रपती संभाजीनगर' अशी स्वतंत्र ओळख निर्माण होईल.

७८ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही मराठवाड्यात राष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक, संशोधन किंवा व्यावसायिक संस्थांचा अभाव जाणवतो. अशा परिस्थितीत एक्स्पो-कम -कन्व्हेन्शन सेंटरसारखा प्रकल्प नुसतीच सुविधा न राहता प्रादेशिक परिवर्तनाचा प्रारंभबिंदू ठरू शकतो. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारने या केंद्राच्या उभारणीकडे 'क्रिटिकल इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प' म्हणून पाहण्याची गरज आहे. यासाठी पीपीपी मॉडेल वा अन्य स्त्रोतांतून निधी उभारता येऊ शकेल. हा प्रकल्प लवकर साकार झाल्यास तो मराठवाड्याच्या आर्थिक, औद्योगिक व सामाजिक विकासाचा मैलाचा दगड ठरेल, यात शंका नाही

# महाराणा प्रताप : लोककल्याणाच्या सामाजिक कार्याची अमर परंपरा

भारतीय इतिहासाच्या दीर्घ आणि समृद्ध परंपरेत काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे स्मरण केवळ त्यांच्या पराक्रमामुळे किंवा राजकीय संघर्षामुळे मर्यादित राहत नाही, तर त्यांच्या सामाजिक जाणिवा, लोककल्याणाची भूमिका आणि मूल्यनिष्ठ जीवनामुळे ती व्यक्तिमत्त्वे काळाच्या पलीकडे जाऊन समाजमनावर अधिराज्य गाजवतात. महाराणा प्रताप हे असेच एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व आहे. स्मृतीदिनानिमित्त महाराणा प्रताप यांचे स्मरण करताना त्यांना केवळ हल्दीघाटीच्या रणांगणावर लढणारा पराक्रमी योद्धा म्हणून पाहणे अपुरे ठरेल. त्यांच्या जीवनाचा खरा अर्थ त्यांच्या सामाजिक कार्यात, प्रजेप्रती असलेल्या निष्ठेत, स्वाभिमानाच्या भूमिकेत आणि लोककल्याणासाठी केलेल्या त्यागात दडलेला आहे. महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन हे समाजकेंद्रित विचारांचे, मानवी मूल्यांचे आणि स्वातंत्र्याच्या व्यापक अर्थाचे प्रतीक होते.

सोळाव्या शतकातील भारत हा सत्तासंघर्षांचा, साम्राज्यविस्ताराचा आणि सामाजिक उलथापालथींचा काळ होता. मुघल साम्राज्याच्या विस्तारामुळे अनेक प्रादेशिक राज्यांवर परकीय सत्तेचे वर्चस्व निर्माण झाले होते. अकबराच्या काळात अनेक राजांनी मांडलिकत्व स्वीकारून आपले राज्य, वैभव आणि व्यक्तिगत सुरक्षितता जपण्याचा मार्ग निवडला. परंतु महाराणा प्रताप यांनी हा मार्ग नाकारला. त्यांनी परकीय सत्तेच्या अधीन जाणे म्हणजे केवळ राजकीय पराभव नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक अधःपतन असल्याचे स्पष्टपणे ओळखले. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य म्हणजे फक्त सत्ता नव्हे, तर समाजाचा आत्मसन्मान, सांस्कृतिक अस्मिता आणि मूल्यनिष्ठ जीवन होते.

महाराणा प्रताप यांची सामाजिक भूमिका त्यांच्या प्रजाभिमुख नेतृत्वातून स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी स्वतःला कधीही प्रजेपेक्षा श्रेष्ठ मानले नाही. राजा म्हणजे ऐश्वर्य उपभोगणारा नव्हे, तर समाजाच्या दुःखात सहभागी होणारा सेवक असतो, हा विचार त्यांनी आपल्या कृतीतून अधोरेखित केला. संकटाच्या काळात त्यांनी राजवाडे, सुखसोयी आणि वैभवाचा त्याग करून आपल्या प्रजेबरोबर जंगलात, डोंगरदऱ्यांत कष्टाचे जीवन स्वीकारले. हा त्याग केवळ व्यक्तिगत नव्हता, तर समाजाशी असलेल्या त्यांच्या अतूट नात्याचे प्रतीक होता. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हे नेतृत्व 'लोककेंद्रित सत्तेचे' आणि 'सामाजिक जबाबदारीच्या राजसत्तेचे' उत्कृष्ट उदाहरण ठरते.

हल्दीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे आयुष्य अत्यंत कष्टमय झाले. अन्नधान्याची टंचाई, आर्थिक अडचणी, सततचा संघर्ष आणि मुघल सत्तेचा दबाव असूनही त्यांनी आपल्या प्रजेचा त्याग केला नाही. उलट, या प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी समाजाला धैर्य, आशा आणि आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. जंगलात राहून त्यांनी जे कष्टाचे जीवन जगले, ते समाजासाठी प्रेरणादायी ठरले. त्यांच्या जीवनातून समाजाला हे समजले की स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्याग, संयम आणि संघर्ष अपरिहार्य असतो.

महाराणा प्रताप यांच्या सामाजिक कार्याचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा आदिवासी समाजाशी असलेला घनिष्ठ संबंध. त्या काळात आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जात होते आणि त्यांच्याकडे दुय्यम दृष्टिकोनातून पाहिले जात होते. परंतु महाराणा प्रताप यांनी या समाजाला स्वराज्याच्या संघर्षात समान भागीदार मानले. आदिवासी समाजाने महाराणा प्रताप यांना जंगलात अन्न, निवारा, मार्गदर्शन आणि संरक्षण दिले. हे नाते परस्पर सन्मान, विश्वास आणि समानतेवर आधारित होते. महाराणा प्रताप यांनी आदिवासी समाजाच्या श्रमशीलतेचा, निष्ठेचा आणि स्वातंत्र्यप्रिय स्वभावाचा सन्मान केला. त्यामुळे समाजातील वंचित घटक स्वराज्याच्या लढ्यात सक्रिय सहभागी झाले आणि सामाजिक समावेशनाचा एक आदर्श निर्माण झाला.

स्वावलंबन ही महाराणा प्रताप यांच्या सामाजिक विचारांची केंद्रस्थानी असलेली संकल्पना होती. मुघल सत्तेने मेवाडवर आर्थिक नाकेबंदी केली तेव्हा राज्यात दारिद्र्य, उपासमारीची आणि असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण झाली. अशा वेळी परकीय सत्तेकडून मदत स्वीकारण्याऐवजी महाराणा प्रताप यांनी स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्यावर भर दिला. जंगलसंपत्ती, शेती, पशुपालन, हस्तकला आणि स्थानिक उद्योग यांच्या माध्यमातून समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हा दृष्टिकोन केवळ आर्थिक नव्हता, तर सामाजिक आत्मनिर्भरतेचा आणि स्वाभिमानाचा पाया घालणारा होता. पुढील काळातील स्वदेशी चळवळीच्या विचारांचे बीज या धोरणात दिसून येते.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातील नैतिक मूल्ये त्यांच्या सामाजिक कार्याचा कणा होती. त्यांनी युद्धातही मानवी मूल्यांचे उल्लंघन केले नाही. स्त्रिया, मुले आणि सामान्य नागरिक यांच्यावर अन्याय होणार नाही, याची त्यांनी विशेष काळजी घेतली. युद्ध जिंकण्यासाठी अनैतिक मार्गांचा अवलंब करणे त्यांनी नाकारले. शत्रूशी लढताना देखील नीती, प्रामाणिकपणा आणि सन्मान यांचा त्याग त्यांनी केला नाही. समाजाला त्यांनी हे शिकवले की उद्दिष्ट कितीही महान असले तरी साधने शुद्ध आणि नैतिक असली पाहिजेत.

स्त्रियांच्या सन्मानाबाबत महाराणा प्रताप यांची भूमिका अत्यंत प्रगत आणि संवेदनशील होती. त्या काळात स्त्रियांना युद्धकैदी बनवणे, अपमानित करणे किंवा त्यांच्यावर अत्याचार करणे सामान्य मानले जात असताना महाराणा प्रताप यांनी अशा कृत्यांना ठाम विरोध केला. स्त्री ही समाजाची आधारस्तंभ आहे, तिचा सन्मान म्हणजे समाजाचा सन्मान आहे, ही भावना त्यांच्या धोरणांतून आणि कृतीतून स्पष्टपणे व्यक्त होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही भूमिका स्त्री-सन्मान आणि मानवी हक्कांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरते.

महाराणा प्रताप यांनी शिक्षण, संस्कार आणि सांस्कृतिक परंपरा यांना देखील महत्त्व दिले. त्यांनी आपल्या कुटुंबात आणि सहकाऱ्यांमध्ये शौर्याबरोबरच नीतिमूल्ये, समाजनिष्ठा आणि देशभक्तीचे संस्कार रुजवले. त्यांच्या पुत्र महाराणा अमरसिंह यांच्यात दिसणारी स्वाभिमानाची, लोककल्याणाची आणि संघर्षशीलतेची भावना ही महाराणा प्रताप यांच्या संस्कारांचीच देणगी होती. सामाजिक नेतृत्वाची ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचली आणि मेवाडच्या स्वाभिमानाची ज्योत अखंड प्रज्वलित राहिली.

महाराणा प्रताप यांचे सामाजिक कार्य केवळ मेवाडपुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या संघर्षामुळे संपूर्ण भारतीय समाजाला स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि सांस्कृतिक अस्मितेचे महत्त्व पटले. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, पराभव न मानण्याचा आणि समाजहित सर्वोच्च मानण्याचा मार्ग होता. त्यामुळे महाराणा प्रताप हे केवळ इतिहासातील योद्धे न राहता लोकनायक ठरले. त्यांच्या जीवनकथेतून समाजाला संघर्षाची दिशा आणि मूल्यांची जाणीव मिळाली.

आजच्या काळात महाराणा प्रताप यांचे स्मरण करताना त्यांचे सामाजिक विचार अधिकच समर्पक वाटतात. आजही समाज आर्थिक विषमता, सामाजिक अन्याय, सांस्कृतिक आक्रमण आणि नैतिक अधःपतनाला सामोरे जात आहे. अशा वेळी महाराणा प्रताप यांचे जीवनकार्य आपल्याला मूल्यांवर आधारित संघर्षाची प्रेरणा देते. त्यांनी शिकवले की खरा पराभव हा तलवारीने नव्हे, तर आत्मसन्मान गमावल्याने होतो. समाजासाठी जगणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि मूल्यांशी तडजोड न करणे, हा त्यांचा वारसा आहे.

महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन म्हणजे सामाजिक जबाबदारीची, त्यागाची आणि लोककल्याणाची जिवंत गाथा होती. त्यांनी सत्ता, संपत्ती आणि वैभवापेक्षा समाजाचे हित मोठे मानले. त्यांच्या त्यागातून आणि संघर्षातून समाजाला स्वातंत्र्याचा खरा अर्थ कळला. म्हणूनच महाराणा प्रताप यांचे स्मरण म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून सामाजिक मूल्यांची पुनःप्रतिष्ठा होय.

स्मृतीदिनानिमित्त महाराणा प्रताप यांना अभिवादन करताना आपण त्यांच्या जीवनातून स्वाभिमान, सामाजिक न्याय, समता, स्वावलंबन आणि लोककल्याणाची प्रेरणा घ्यायला हवी. महाराणा प्रताप हे तलवारीपेक्षा मूल्यांवर विश्वास ठेवणारे, समाजासाठी जगणारे आणि इतिहासाला दिशा देणारे महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या विचारांची आणि कार्याची उज्ज्वल परंपरा जपणे, हेच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## सोय..

नगरसेवकांसमस्त
फाईव्ह स्टार सोय
माहीत नाही कधी
कशाला म्हणे होय

सत्ता स्थापना सुरू
नको काही हयगय
कुंपणी उड्या मारु
मुरलेली जुन सवय

बरी जमली गणिते
बिघडूनजाईलं लय
प्रत्येकपक्षा भोवती
भिती विणते वलय

भिरभिर उडे पतंगी
वाही अनिल मलय
टपून बसे चाणाक्य
कसाहीयेईल प्रलय

दमछाक होई नंतर
सावरताना आलय
बातमी उलटसुलट
धड धड करी हृदय

ऐश करु दे जराशी
मिळे निवांत समय
जनसेवा नंतर पाहू
हो विचार विनिमय

अघटीत घडे काही
स्थिती होई विस्मय
विरघळू जाऊ शके
माणूस अंतिमृण्मय

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## नमुंमपा आयुक्त डॉ.शिंदे यांची मुंबई मॅरेथॉनमध्ये उल्लेखनीय यशस्वी कामगिरी



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१८, नवी मुंबई :** धावणे हा सर्वोत्तम व्यायाम असल्याचे मनोमन जाणून आपली धावण्याची आवड ध्यासात परिवर्तन करणारे आणि आपल्या अत्यंत व्यस्त दिनक्रमातूनही पहाटे लवकर धावण्याचा नियमित सराव करणारे नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आज मुंबईत झालेली अत्यंत प्रतिष्ठेची टाटा मुंबई मॅरेथॉन अकराव्यांदा सहभागी होत ४२ किलोमीटरचे अंतर ४ तास ३९ मिनिटे २३ सेकंदात पूर्ण केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील धावपटूंचा सहभाग असणाऱ्या या मुंबई मॅरेथॉन मधील उल्लेखनीय कामगिरीबद्दल आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.गतवर्षी आयुक्तांनी दक्षिण आफ्रिकेत झालेल्या जागतिक स्तरावरील मानाच्या कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये सहभागी होत ८६.६ किलोमीटर अंतर ११ तास १० मिनिटे ५६ सेकंदात पूर्ण केले होते. या जागतिक मॅरेथॉनमध्ये सहभागी होणारे ते एकमेव सनदी अधिकारी आहेत. त्याचप्रमाणे गतवर्षी टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये ही सहभागी होत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली होती.नुकत्याच नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका सुव्यवस्थित रितीने पार पडल्या असून महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या अत्यंत व्यस्त कामकाजाच्या कालावधीतही आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पहाटेच्या वेळी धावण्याचा सराव करून व वेळेत कार्यालयात येऊन, पुन्हा उशिरापर्यंत कार्यालयीन कामकाज केले, मात्र सरावात खंड पडू दिला नाही. निश्चित ध्येयाच्या दिशेने वाटचाल व त्यासाठी अथक परिश्रम घेण्याची तयारी आणि योग्य नियोजन या बलस्थानच्या आधारावर त्यांनी हे यश संपादन केले आहे.पहाटे ५ पासून मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून प्रारंभ झालेली २१वी टाटा मुंबई मॅरेथॉन पुढे हुतात्मा चौक, चर्चगेट मार्गे मरीन ड्राईव्ह, पेडर रोड, हाजी अली, वांद्रे वरळी सीलिंक, माहीम, प्रभादेवी, हाजी अली व परत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या मार्गावर आयोजित करण्यात आली होती. यावेळी पहिल्यांदाच मॅरेथॉनच्या मार्गात कोस्टल रोडचा समावेश होता. या उल्लेखनीय यशस्वी कामगिरीबद्दल नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाच्या गणित प्राविण्य व गणित पारंगत परीक्षांचे चंद्रपूर जिल्ह्यात यशस्वी आयोजन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळ यांच्या वतीने आयोजित गणित प्राविण्य परीक्षा व गणित पारंगत परीक्षा रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत चंद्रपूर जिल्ह्यात यशस्वीपणे संपन्न झाल्या. विद्यार्थ्यांमध्ये गणिताची गोडी निर्माण व्हावी, गणितीय संकल्पनांचे आकलन अधिक स्पष्ट व्हावे व तर्कशक्ती विकास व्हावा, या उद्देशाने सदर परीक्षांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी जिल्ह्यातून इयत्ता पाचवीचे २२५ विद्यार्थी व इयत्ता आठवीचे २२० विद्यार्थी गणित प्राविण्य परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. तसेच इयत्ता दहावीचे ३५ विद्यार्थी गणित पारंगत परीक्षेसाठी सहभागी झाले होते. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी परीक्षा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. संबंधित तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी केंद्रावर उपस्थित राहून परीक्षा दिली. सदर परीक्षा शांततापूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. या यशस्वी आयोजनासाठी चंद्रपूर जिल्हा गणित मंडळाचे जिल्हाध्यक्ष धनंजय जीराफे, सचिव गणेश तुराळे, उपाध्यक्ष सुनील शेरकी, जगदीश क्षीरसागर, सहसचिव चंद्रकांत पावडे, रवींद्र मते, कु.प्रतिमा उमक, कोषाध्यक्ष सुधाकर कोसरकर, प्रसिद्धी प्रमुख रामकृष्ण चनकापुरे, तालुकाध्यक्ष पंकज मते, शरद राजुरकर, संजीव वानखेडे, हरिहर खरवडे, शैलेश देवाडे, अमोल माथनकर, के.बी.मांडवकर, मनीष नगराळे यांच्यासह प्रतिभा सोमेश्वर कायरकर, विद्या धेंगडे, महेश पेटकर, विद्या समिती प्रमुख अरुंधती कावडकर तसेच जिल्हा व तालुका कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी व सदस्यांचे आणि सहभागी शाळांची मुख्याध्यापक तथा विद्यार्थ्यांचे पालक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या समन्वय व परिश्रमामुळेच ही परीक्षा जिल्ह्यात यशस्वीरीत्या पार पडल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## अनंत येरावार यांची BSF सीमा सुरक्षा बल मधे निवड; कुंडलवाडीचा अभिमान



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१८, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील अनंत राजेश्वर येरावार यांची इडऋ सीमा सुरक्षा बल मध्ये यशस्वी निवड झाली असून या यशामुळे कुंडलवाडी शहर व परिसरात आनंदाचे वातावरण आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करत अनंत यांनी हे यश संपादन केले असून त्यांच्या कामगिरीचा सर्वत्र गौरव होत आहे. अनंत यांचे प्राथमिक शिक्षण कुंडलवाडी येथे, माध्यमिक शिक्षण धर्माबाद येथे, तर उच्च माध्यमिक शिक्षण पानसरे महाविद्यालय, अर्जापूर येथे झाले. त्यांचे वडील स्वाध्याय बंधू व शेतकरी होते. स्वाध्याय परिवाराच्या संस्कारातून प्रामाणिकपणा, कष्टाची तयारी व समाजाभिमुख विचार अनंत यांच्या जीवनात रुजले. आर्थिक अडचणी असूनही वडिलांनी दिलेल्या संस्कारांच्या बळावर अनंत यांनी शिक्षण पूर्ण करून शासकीय सेवेत प्रवेश मिळवला. येरावार परिवारातील शासकीय नोकरी मिळवणारे अनंत हे पहिलेच युवक असून त्यांच्या या यशामुळे परिसरातील अनेक युवकांना प्रेरणा मिळत आहे. देशसेवेची संधी मिळाल्याबद्दल अनंत यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. अनंत येरावार यांच्या या निवडीबद्दल साईनाथ उत्तरवार, दत्तात्रय जायेवार, सायना बत्तुलवार, सयाराम भोरे, पोतना अलकोंडवार, संजय बीरमवार, सुभाष दरबस्तेवार, सुरेश शेरियाल, साईनाथ तिपणे,संजय दुप्पले, राजेश ब्यागलवार, सुरेश नामावार, दत्ता हमंद, करण समेटवार, डॉ.नरेश बोधनकर यांच्यासह कुंडलवाडी परिसरातील नागरिक, मित्रपरिवार व स्वाध्याय परिवाराकडून स्वागत व शुभेच्छांचा वर्षाव होत असून, त्यांच्या उज्वल भविष्यासाठी सर्वजण सदिच्छा व्यक्त करत आहेत.

# सरकार आणि न्यायव्यवस्था परस्परपूरक, दोघांचाही उद्देश 'लोकसेवा'च

## निफाडमध्ये शासकीय योजनांच्या महाशिबिराचा उत्साह !

**न्यायालयीन टीका म्हणजे सुधारणेची संधी**

न्यायालयाने व्यक्त केलेले मत हे प्रशासनावर टीका नसून, जनतेला चांगल्या सेवा मिळाव्यात यासाठी दिलेली ती एक सुधारणावादी सूचना असते. त्यामुळे नागरिकांनी आणि प्रशासनाने हा दृष्टिकोन सकारात्मक ठेवावा, असे आवाहन न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांनी यावेळी केले.

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** सरकार आणि न्यायपालिका यांच्यात समन्वयाचा अभाव आहे किंवा ते एकमेकांच्या विरोधात काम करतात, हा समाजात पसरलेला गैरसमज चुकीचा आहे. दोन्ही व्यवस्थांचा मूळ उद्देश 'लोकसेवा' हाच आहे. शासनाकडून एखादी चूक झाल्यास न्यायालय त्यावर जे भाष्य करते, ती टीका नसून व्यवस्थेतील त्रुटी सुधारण्यासाठी केलेली सूचना असते, असे स्पष्ट प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांनी केले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाअंतर्गत नाशिक जिल्हा व निफाड तालुका विधी सेवा समितीच्या वतीने आयोजित शासकीय योजनांच्या महाशिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. निफाड ही न्यायमूर्ती महादेव रानडे यांची जन्मभूमी असून त्यांच्या जयंतीदिनी हे शिबीर आयोजित केल्याबद्दल त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले.

**बालविवाहासारख्या गंभीर समस्येवर बोट !**

न्यायमूर्ती कोतवाल यांनी आपल्या भाषणात सामाजिक प्रश्नांवरही भाष्य केले. ते म्हणाले, बालविवाह ही समाजातील अत्यंत गंभीर समस्या आहे. 'पोकसो' कायद्यांतर्गत यासाठी कठोर शिक्षेची तरतूद आहे. नागरिकांनी न्यायासाठी थेट न्यायालयात येण्याऐवजी प्रथम विधी सेवा समितीकडे अर्ज करावा आणि तिथे समाधान न झाल्यास शेवटचा पर्याय म्हणून न्यायालयाचे दार ठोठावावे.

**बालविवाह लावणाऱ्यांवर कठोर कारवाई - जिल्हाधिकारी**

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी प्रशासकीय भूमिकेवर प्रकाश टाकला. महसूल विभागामार्फत ५४ प्रकारच्या शासकीय योजना उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. नाशिक जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सतर्क असून विवाह लावून देणाऱ्यांवरही कठोर कारवाई केली जाईल. गावातील सरपंचांनी अशा घटनांची माहिती तात्काळ प्रशासनाला द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच दिव्यांगांवर अन्याय झाल्यास तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

**शिबिरा बद्दल :**

*** दिमाखदार आगमन :** कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, विंचूरच्या लेझिम पथकाने मिरवणुकीद्वारे मान्यवरांचे स्वागत केले.

*** उद्धाटन सोहळा :** न्यायमूर्ती कोतवाल यांच्या हस्ते फीत कापून व न्यायमूर्ती रानडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराचे उद्धाटन झाले.

*** योजनांची रेलचेल :** शिबिरात शासनाच्या विविध विभागांचे ४० स्टॉल उभारण्यात आले होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे व धनादेश किटचे वितरण करण्यात आले.

**मान्यवरांची उपस्थिती :** कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिकचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी होते. याप्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जितेंद्र जैन, अश्विन भोबे, विधी व न्याय विभागाचे सचिव दिलीप घुमरे, उपसचिव विलास गायकवाड, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, निफाडचे जिल्हा न्यायाधीश ए. ए. शेख, नाशिक बार असोसिएशनचे अध्यक्ष नितीन ठाकरे, निफाड वकील संघाचे अध्यक्ष प्रवीण ठाकरे यांच्यासह अनेक न्यायिक अधिकारी व वकील उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा न्यायाधीश एस. डी. जगमलानी यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी शुभदा सुक्रे आणि सुहास सुरळीकर यांनी केले. आभार निफाडचे जिल्हा न्यायाधीश ए. ए. शेख यांनी मानले.

## विद्यार्थ्यांच्या कलात्मक जडणघडणीमुळे सांस्कृतिक महोत्सवाला मिळते जोड : प्राचार्य दोंतुलवार




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, विसापूर (चंद्रपूर) :** विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम महत्वाचे आहे. यामुळे त्यांच्यातील सुप्त कलागुणांना चालना मिळते. आत्मविश्वास बळावतो. जिद्द व चिकाटीने आपल्यातील कलाविष्काराचे सादरीकरण करतो. यासाठी सांस्कृतिक संमेलन महत्वाचे आहे.

खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या कलात्मक जडणघडणीत सांस्कृतिक महोत्सवाची जोड महत्वाची भूमिका पार पाडते, असे प्रतिपादन चिंतामणी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्याल विसापूरचे प्राचार्य प्रशांत दोंतुलवार यांनी कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी केले. बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील चिंतामणी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने शाळेच्या प्रांगणात शनिवारला वार्षिक सांस्कृतिक संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी उदघाटक म्हणून विसापूरचे उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, अध्यक्ष प्राचार्य प्रशांत दोंतुलवार, प्रमुख अतिथी सामाजिक कार्यकर्ते राजू लांडगे, युवा नेते संदीप पोडे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष देविदास तुंगिडवार, शिक्षक अरुण टोंगे यांची उपस्थिती होती.

यावेळी चिंतामणी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक वसंतराव दोंतुलवार, माजी अध्यक्ष स्व. डॉ. वैभव दोंतुलवार व माता सरस्वती यांच्या प्रतिमेला मालार्पण व दीपप्रज्वलन करुन मान्यवरांच्या हस्ते सांस्कृतिक महोत्सवाला प्रारंभ करण्यात आला. दरम्यान शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्ती, आदीवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारे गोंडीनृत्य, चित्रपट संगीतावरील नृत्याविष्कारांने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. कलात्मक पद्धतीने नाटिका सादर करून प्रबोधन केले. वेगवेगळ्या संस्कृतीचे नृत्य सादरीकरणाने अंतर्मुख होण्यास पालकांना व प्रेक्षकांना दाद देण्यास विद्यार्थ्यांनी भाग पाडले. लावणी नृत्य, भारुड नृत्याने प्रेक्षक सुखावले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जेष्ठ शिक्षक अरुण टोंगे यांनी केले. संचालन व आभार प्रदर्शन श्रद्धा साखरकर यांनी केले. सांस्कृतिक महोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी चंद्रकांत पावडे, विना चांदेकर, सुंभागी बरडे, ललिता पोडे, संगीता उमरे, विजय सातपुते, सोनाली आत्राम, संतोषी तगलपल्लीवार, विकास कल्लुरवार, मुन्नालाल पुंडे, सुभाष भटवलकर, रविंद्र कोडापे, विलास देठे आदींनी सहकार्य केले.

## फातिमाबी साहित्य संमेलनात प्रवीण बागडे यांचा काव्यवाचनासाठी सन्मान




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, श्रीरामपूर :** भारताच्या पहिल्या मराठी मुस्लिम महिला शिक्षिका फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था, श्रीरामपूर यांच्या वतीने ११ जानेवारी २०२६ रोजी ऑकेशन्स बँक्वेट हॉल, बेलापूर रोड येथे आयोजित चौथे राज्यस्तरीय युगस्त्री फातिमाबी शेख साहित्य संमेलन उत्साहात पार पडले.

या संमेलनातील कवी संमेलन सत्रात सामाजिक आशय असलेल्या प्रभावी काव्यवाचनासाठी नागपूर येथील साहित्यिक प्रवीण बागडे तसेच प्रभाकर सोमकुवर यांचा गौरव करण्यात आला. 'युगस्त्री फातिमा माई' या विषयावर तसेच सामाजिक वास्तव मांडणाऱ्या कवितांच्या सादरीकरणासाठी दोन्ही कवींना मराठी भाषांतरित पवित्र कुरआन, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या सन्मानाबद्दल साहित्यिक वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

फातिमा शेख यांच्या कार्याचा गौरव करताना फातिमाबी शेख प्रतिनिधिक काव्यसंग्रहाच्या संपादिका अनिसा सिकंदर यांनी, फातिमाबींची जयंती शाळा-महाविद्यालये तसेच शासकीय-निमशासकीय कार्यालयांमध्ये व्यापक पातळीवर साजरी व्हावी, तसेच त्यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन करण्यासाठी ठोस प्रयत्न होणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले. कविसंमेलन नूरजहां शेख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या कवींनाही सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन खाजाभाई यांनी केले, तर आभारप्रदर्शन शफी सैय्यद यांनी केले. स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि प्रबोधनाचा वारसा जपणाऱ्या फातिमाबी शेख यांच्या स्मृतीला उजाळा देणारे हे संमेलन साहित्यप्रेमींमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरले.

## अरमान मलिकची प्रकृती बिघडली, गायक रुग्णालयात दाखल



मुंबई – सुप्रसिद्ध गायक अरमान मलिकचा नुकताच सोशल मीडियावर एक फोटो समोर आला आहे, ज्यामुळे त्याच्या चाहते चिंतेत आहेत. अरमान मलिकला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. आरोग्याची माहिती देत अरमान मलिकनं एक फोटो शेअर केला, परंतु त्याच्या रुग्णालयात दाखल होण्याचं कारण सांगितलं नाही. अरमाननं सांगितलं की, गेल्या काही दिवसांपासून त्याला बरं वाटत नव्हतं, म्हणूनच त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

**हॉस्पिटलमधून शेअर केलेला फोटो**

अरमान मलिकनं हॉस्पिटलमधून एक फोटो शेअर केला आहे, ज्यामुळे त्याचे चाहते चिंतेत आहेत. अरमाननं फोटो शेअर करत लिहिलं की, 'गेले काही दिवस चांगले गेले नाहीत.' फोटो पोस्ट करताच चाहते चिंता व्यक्त करू लागले आणि त्याच्या प्रकृतीबद्दल विचारपूस करू लागले आहेत. गायकानं फोटो शेअर करत सांगितलं की, तो आता बरा होत आहे. अरमाननं पुढे लिहिलं, तो विश्रांती घेत आहे आणि बरा होत आहे. हॉस्पिटलमधून शेअर केलेल्या फोटोमध्ये त्याच्या हातात आयव्ही ड्रिप दिसत आहे. अरमान मलिकने हा फोटो शेअर करताच चाहत्यांनी चिंता व्यक्त करण्यास सुरुवात केली. एकाने कमेंट केली, 'लवकर बरा हो.' दुसऱ्यानं विचारलं, 'तुला रुग्णालयात का दाखल केलं आहे? काय झालं?' इतर युजर्सनेही कमेंट करत गायकाच्या तब्येतीबद्दल चिंता व्यक्त केली आणि लवकर बरा होण्यासाठी प्रार्थना केल्या.

दरम्यान, अरमाननं त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीजवर एक पोस्ट पुन्हा शेअर केली, ज्यामध्ये लिहिले होतं, 'या वर्षी तुम्हाला ज्या गोष्टींची काळजी घ्यायची आहे त्या यादीत स्वतःचा समावेश करायला विसरू नका.' अरमान मलिकने अलीकडेच सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करून लोकांना त्याची आणि त्याचा भाऊ अमाल मलिकची तुलना करू नका असं आवाहन केलं तेव्हा तो चर्चेत आलेला.

# भाविकांच्या सेवेत मलंगगडावर देशातील सर्वात मोठी आणि लांब पल्ल्याची फ्युनिक्युलर ट्रेन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, कल्याण (ठाणे) :** कल्याणमधील श्री मलंगगडावर आता भाविकांना मोठी सुविधा मिळणार आहे. देशातील सर्वात लांब फ्युनिक्युलर सेवा अखेर सुरू झाली आहे. रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी भाजपा आमदार किसन कथोरे आणि सुलभा गायकवाड यांच्या हस्ते या सेवेचं लोकार्पण करण्यात आले. आजपासून सुरू झालेल्या या फ्युनिक्युलर सेवेमुळे भाविकांना मलंगगडावर जाणं अधिक सोपं, सुरक्षित आणि जलद होणार आहे. विशेष म्हणजे, सुप्रीम कंपनीकडून भाविकांसाठी दोन दिवस ही सेवा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे.

श्री मलंगगड यात्रेच्या आधीच आता भाविकांच्या सेवेत फ्युनिक्युलर सेवा यंदा दाखल झाल्याने यंदाच्या यात्रेत भाविकांना मोठी सोय होणार आहे.हा पथदर्शी प्रकल्पाचा प्रस्ताव २००४ मध्ये आमदार किसन कथोरे यांनी मांडला होता. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळात या प्रस्तावाला मंजुरी मिळाली होती. मात्र मधल्या काळात याकडे दुर्लक्ष झालं होतं. त्यानंतर २०१२ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.

मात्र, विधानसभा क्षेत्राचे विभाजन झाल्यानंतर हा प्रकल्प रखडला होता. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी या



कामाला गती देण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. यानंतर कामाला पुन्हा सुरुवात झाली आणि अखेर यंदा २०२६ मध्ये या फ्युनिक्युलर प्रकल्पाचं काम पूर्ण झालं आहे.मलंगगडावर, हाजी मंगलला कल्याण, मुंबई, नवी मुंबईतून अनेक भाविक येतात. जाण्यासाठी अंदाजे २६०० पायऱ्या चढून वर गडावर जावं लागतं. हा गड चढण्यासाठी जवळपास २ तास लागतात. मात्र आता फ्युनिक्युलर ट्रेन आजपासून सुरू झाल्याने हे २ तासांचं अंतर अवघ्या १० मिनिटांत पूर्ण करून जाता येईल. या सुविधेच्या देखरेखीसाठी ७० जण असून १२० जण यातून प्रवास करू शकतात, अशी माहिती आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या सेवेला मंजुरी मिळाल्यानंतर मुंबई मंत्रालयातून फ्युनिक्युलर सुरू करण्याची परवानगी देण्यात आली. श्री मलंगगड यात्रेच्या पार्श्वभूमीवर ही सेवा सुरू झाल्याने भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी मलंगगडावर जाण्यासाठी पायऱ्या चढून जावे लागत असे, ज्यामुळे अनेक भाविकांना त्रास होत असे. आता या फ्युनिक्युलर सेवेमुळे वृद्ध आणि लहान मुलांनाही सहजपणे गडावर जाता येणार आहे. या सेवेमुळे मलंगगडावरील पर्यटनाला ही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

### काय आहे फ्युनिक्युलर सेवा ?

फ्युनिक्युलर ही एक प्रकारची केबल रेल्वे प्रणाली आहे, ट्रॉली सारखी सुविधा आहे. गुरुत्वाकर्षण आणि केबल्सचा वापर करून मागे-पुढे अशा दोन गाड्या एका उंच उतारावर चालवल्या जातात. फ्युनिक्युलर हा शब्द लॅटिन भाषेतील असून लहान दोरी असा त्याचा अर्थ होतो. फ्युनिक्युलर सेवा लिफ्ट आणि ट्रेन अशा दोघांची मिळून तयार झालेली सेवा आहे.

या फ्युनिक्युलर सेवेसाठी पाठपुरावा करणारे कल्याण लोकसभेचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे हे लोकार्पणच्या वेळी अनुपस्थित असल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. या लोकार्पण सोहळ्याला शिंदे गटाचे खासदार आणि पदाधिकारी अनुपस्थित असल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

# पेणमध्ये आदिवासी मुलांसाठी प्रेरणा कार्यशाळा

## या कार्यशाळेतून आदिवासी मुलांना चांगली 'प्रेरणा' मिळेल - पोलिस अधीक्षक दलाल

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१८, पेण (रायगड) :** आदिवासी मुलांचे उज्वल भविष्य घडावे आणि त्यांच्यात स्वकर्तृत्वाची जिद्द निर्माण करावी या उद्देशाने रायगड पोलिस व सामाजिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण, करिअर मार्गदर्शन, बालविवाह, अंधश्रद्धा जनजागृती करण्याकरिता 'प्रेरणा' नावाच्या कार्यशाळेचे आयोजन हेटवणे जलसंपदा वसाहत येथील वरवणे आश्रम शाळेत करण्यात आले होते.

यावेळी उपस्थित आदिवासी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रायगड जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षक आचल दलाल यांनी अशा प्रकारच्या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना अतिशय चांगल्या प्रकारची प्रेरणा मिळणार असल्याचे सांगितले. यावेळी व्यासपीठावर प्रात अधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल, वडखळ पोलिस निरीक्षक संतोष जाधव, दादर सागरी पोलीस निरीक्षक




संजयकुमार ब्राह्मणे, भरोसा सेल पोलिस निरीक्षक सरिता चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक ऑचल दलाल यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मी ज्यावेळी या जिल्ह्याचा पदभार स्वीकारला त्यावेळी घेतलेल्या माहितीनुसार या जिल्ह्याची प्रगतशील जिल्हा म्हणून ओळख आहे.

मात्र जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी बालविवाहाचे प्रकार घडत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे याची जनजागृती व्हावी हा विचार करत असतानाच पेण पोलिस ठाण्याच्या माध्यमातून नवरात्रोत्सवात आयोजित करण्यात आलेल्या आदिवासी बांधवांच्या कार्यक्रमातून अशा प्रकारचे जनजागृतीपर कार्यक्रम घेण्याची 'प्रेरणा' मिळाली आणि म्हणून आम्ही आता जिल्हाभर हा 'प्रेरणा' नावाची कार्यशाळा घेण्याचा निर्णय घेतला आणि त्याची सुरुवात आम्ही आज पेण तालुक्यापासूनच सुरुवात केली आहे असे सांगितले. त्या पुढे विद्यार्थ्यांची संवाद साधताना ज्या ठिकाणी बालविवाह होत असतील अशा प्रकारांना आळा बसविण्यासाठी तुम्ही तातडीने ११२ या नंबरवर संपर्क साधून आम्हाला कळवा आणि हे बालविवाह रोखण्यासाठी आम्हाला सहकार्य करा. त्याचप्रमाणे परिसरात पसरत असणारी अंधश्रद्धा, भोंदूगिरी अशा कोणत्याही गोष्टींवर विश्वास ठेवू नका आणि तसे प्रकार घडत असतील तरी देखील आमच्या पोलिस प्रशासनाला सांगा.

विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेतून प्रेरणा घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याची जिद्द सोडू नका. आपल्या कलाकौशल्यातून स्वतः चे जीवन आपण बदलू शकता, त्यासाठी आजच संकल्प करा आणि आपल्यासह आपल्या कुटुंबियांना देखील आजच्या कार्यशाळेचे महत्व आणि येथे मिळालेल्या शिकवणीचे कथन करा असे सांगितले. तर आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांनी आपल्या प्रास्ताविकातून आज जिल्हा पोलिस अधीक्षक आचल दलाल यांच्या प्रेरणेतून विद्यार्थ्यांना एक वेगळी यशस्वी जीवनाची दिशा मिळत आहे. आपण बुद्धीने श्रम केले तर आपण आयुष्यभराची शिदोरी कमवू शकतो असे सांगितले.

या शिबिरामध्ये अंधश्धा निर्मूलन, बालविवाह जनजागृती, ओग्यविषयक तसेच शैक्षणिक मार्गदर्शन देखील करण्यात आले. यावेळी आदिवासी समाजाशी निगडित विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम देखील पार पडले.

# टाकळी ढोकेश्वर जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचा समारोप

## बाल महोत्सव निराश्रितांचे व्यासपीठ; विभागीय उपायुक्त चंद्रशेखर पगारे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र शासनाच्या जिल्ह्यातील महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्यावतीने जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सव २०२६-२६चे आयोजन १६ ते १८ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले. जिल्ह्यातील शासकीय तथा निमशासकीय बालगृहातील मुलांचा शारीरिक व मानसिक विकास व्हावा तसेच इतर मुलांसोबत स्पर्धा करण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी चाचा नेहरू बालमहोत्सव घेण्यात आला. बक्षीस वितरण सोहळा नुकताच महिला व बालविकास नाशिक विभागाचे उपआयुक्त चंद्रशेखर पगारे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडला.

टाकळी ढोकेश्वर येथिल आदर्श ग्रामीण महिला मंडळ संचलित नवीन गोकुळ बालसदन मैदान येथे रंगलेल्या तीन दिवसीय कबड्डी, खो-खो, गोळा फेक, धावणे, रिले, कॅरम, बुद्धिबळ, निबंध, वक्तृत्व, वादविवाद, नृत्य, गायन आदी जिल्हास्तरीय स्पर्धांचे



बक्षीस वितरण महिला व बालविकास नाशिक विभागाचे उपआयुक्त चंद्रशेखर पगारे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महिला व बालविकास अधिकारी नाशिक विभागाचे सतिश मुंढे, जिल्हा परिविक्षा अधिकारी नाशिक अनिल भोसे, सीएसए संस्थेच्या सिस्टर लुसी, बालकल्याण समितीच्या सदस्या ॲड. अनुराधा येवले, बाल न्याय मंडळाच्या सदस्या बेबी बर्डे, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सरपंच बाळासाहेब खिलारी, आदर्श गाव योजनेचे महेश पाटील, बाल न्याय मंडळाच्या अध्यक्षा ॲड नंदनवार आदी मान्यवर उपस्थित होते. अनाथ, निराधार, उन्मार्गी व निराश्रित अशा बालकांच्या कला क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी चाचा नेहरू बाल महोत्सव अत्यंत उपयुक्त असून ते निराश्रितांचे व्यासपीठ ठरत आहे. स्पर्धातूनच यशस्वी व्यक्तिमत्व घडत असते. म्हणून स्पर्धेला न घाबरता विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घ्यावा. यातून विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळेल, असे प्रतिपादन उपआयुक्त चंद्रशेखर पगारे यांनी केले. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केल्यामुळे हा महोत्सव जिल्ह्यातील सर्वात मोठा बाल महोत्सव ठरला. स्पर्धामध्ये विजेते स्पर्धक नागपूर येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील चाचा नेहरू बाल महोत्सव २०२५-२६ स्पर्धे करीता पात्र ठरले आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श ग्रामीण महिला मंडळाचे रावसाहेब जिल्हा परिविक्षा अधिकारी योगिराज जाधव यांनी तर आभार जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी मानले. चाचा नेहरू बाल महोत्सवाच्या कार्यक्रमासाठी सीएसए संस्थेच्या जुई झावरे राहुल झावरे सर, मंजुश्री झावरे, अजिंक्य आंधळे व आदर्श ग्रामीण महिला मंडळ अध्यक्षा मंगल झावरे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. डॉ.अरुणराव इथापे, प्रियदर्शनी संस्था, संगमनेर, विनायक आव्हाड, शिवशंकर संस्था पाथर्डी, राजेंद्र हासे, जयशंकर संस्था, पाथर्डी, सचिन तरवडे, नवोदय संस्था पाथर्डी, महेंद्र सिरसाठ, गांधी बालगृह, चाईल्ड लाईन संस्था, संजय कदम,महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अहिल्यानगर, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, आदर्श ग्रामीण महिला मंडळाच्या सर्व कर्मचाऱ्यांना विशेष सहकार्य करून परिश्रम घेतले.

# थोडक्यात

## सुरुल येथे विद्यार्थ्यांचा बाल बाजार उत्साहात



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१८, पाटण (सातारा) :** सुरूल येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे आयोजित करण्यात आलेला बाल बाजार नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सुरुल ता. पाटण येथील सातारा जिल्हा प्राथमिक शाळा येथे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान मिळावे, जमखर्च समजावा, स्वावलंबनाची जाणीव निर्माण व्हावी तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने शाळेच्या वतीने बाल बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमासाठी उत्तम नियोजन करण्यात आले असून आकर्षक मांडणी व बैठक व्यवस्थेमुळे बाल बाजार अधिकच उठावदार ठरला. बाल बाजारात शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात भाजीपाला तसेच विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले होते. विद्यार्थी स्वतः उत्साहाने ग्राहकांना हाक देत विक्री करताना दिसत होते. प्रत्येक स्टॉलला स्वतंत्र नाव देण्यात आले होते तसेच संबंधित विद्यार्थ्याचे नाव व इयत्ता स्पष्टपणे दर्शविण्यात आली होती. या बाल बाजाराला ग्रामस्थ, पालक, महिला व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली. उपस्थितांनी विद्यार्थ्यांनी विक्रीस ठेवलेल्या भाजीपाल्याची खरेदी केली तसेच खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. परिसरातील काही शिक्षकही आपल्या विद्यार्थ्यांसह बाल बाजारास भेट देण्यासाठी आले होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी. सुरुल गावचे सरपंच विष्णू संकपाळ सदस्य भाऊसो संकपाळ किंग मेकर अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष विकास संकपाळ, योगेश संकपाळ, शंकर संकपाळ शाळेच्या मुख्यध्यापिका शोभा माने, शिक्षकवृंद तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिस्तबद्ध नियोजन व शैक्षणिक दृष्टिकोन यामुळे या बाल बाजार उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## जि.प.शाळा माळीवस्ती (विंचूर) येथे 'बाल आनंद मेळावा' संपन्न



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माळीवस्ती येथे 'बाल आनंद मेळावा' मोठ्या उत्साहात पार पडला.या मेळाव्याचे उद्घाटन विंचूरचे सरपंच सचिन दरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा आणि त्यांना प्रत्यक्ष व्यवहाराचे ज्ञान मिळावे, या उद्देशाने या आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेंद्र खैरे व राजाभाऊ दरेकर, संतोष राऊत, राहुल पुंड, सोमनाथ खैरे, वसंत पुंड, सुनील पुंड, सदाशिव गावकर, किसन चव्हाण, सचिन पुंड, भास्कर जाधव, योगेश जाधव, दीपक जाधव, राजेंद्र पुंड, सिताराम चव्हाण, बाळासाहेब चव्हाण, महेश खैरे, मंगेश राऊत, संदीप खैरे तसेच गावातील शिक्षण प्रेमी नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या माता-पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका साबळे मॅडम,आघाव सर तसेच अंगणवाडीच्या जोशी व राऊत यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आणि पालकांचे स्वागत केले. या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे आणि वस्तूंचे स्टॉल लावले होते. उपस्थित मान्यवरांनी व पालकांनी या स्टॉलला भेट देऊन पदार्थांची चव चाखली व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना खरेदी-विक्री आणि आर्थिक व्यवहाराचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि उत्साह यावेळी दिसून आला.

## हिंद दी चादर श्री गुरुतेग बहादुर यांच्या ३५० वे शहीदी समागम वर्ष

### जिल्ह्यातील शाळांमध्ये माहितीपट प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, प्रभात फेरी




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, छ.संभाजीनगर :** हिंद दी चादर श्री गुरुतेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीद समागम वर्षानिमित्त त्यांचे कार्य व इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा. यासाठी शाळांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यात विविध शाळांमध्ये माहितीपट प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा, प्रभात फेरी आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यासंदर्भात शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात ४४५९ शाळा आहेत. त्यातील ३९४३ शाळांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व स्पर्धा परीक्षा घेऊन जनजागृती करण्यात आली. २५९७ शाळांमध्ये समुह गीत गायनाचे आयोजन करण्यात आले. २९३० शाळांनी प्रभात फेरी काढून गावात जनजागृती केली. ४१२५ शाळांमध्ये माहितीपट व भक्तीगीताचे व्हिडीओद्वारे प्रदर्शन करण्यात आले. आयोजीत केलेल्या विविध स्पर्धांमधून १३६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नवगाव येथे प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच गुरुतेग बहादुर यांच्या जीवनावर आधारित हिंद दी चादर या माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. पिंपळगाव गंगदेव ता. छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये श्री गुरुतेग बहादुर यांच्या ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्षा निमित्त विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तिडका ता.सोयगाव येथे चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जोगेश्वरी ता. गंगापूर प्रभात फेरी काढून त्यांच्या जीवनावर आधारित गीत विद्यार्थ्यांना ऐकवले. तर टोणगाव येथे गुरूतेग बहादूर प्रभातफेरी व चित्रकला स्पर्धा आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील ग्रामिण व शहरी भागातील विविध शाळांमध्ये हे उपक्रम राबवून जनजागृती करण्यात आली.